- ***कर्मवीर शांताराम बापू कोंडाजी वावरे महाविद्यालय सिडको नाशिक***
- ***संशोधन प्रकल्प अहवाल विषय***
- नाशिक जिल्ह्यातील द्राक्षे उत्पादनाचा चिकित्सक अध्ययन
- वर्ग ***: एम.ए.भाग 2 वर्ष 2020-21***
- ***एम ए अर्थशास्त्र संशोधन शास्त्र विषया अंतर्गत शोध प्रबंध***
- ***संशोधक : माधुरी शांताराम निकम***
- ***मार्गदर्शक : प्रा. डॉ. सोनवणे आशातला देवराम***

- प्रस्तावना :
- वाढत्या लोकसंख्येला अन्न धान्याचा पुरवठा करण्यासाठी शेती च्या उत्पादन वाढीची गरज 19 व्या शतकात जाणवायला लागली. सन 1881च्या फेमीन कमिशन ने शिफारशी केल्या नुसार जुलै 1883 मध्ये कृषी खात्याची निर्मिती करण्यात आली. शेती क्षेत्राशी निगडीत सर्व विभागाचा त्यात समावेश करून ग्रा मीण भागात शेतामध्ये उत्पादन वाढीसाठी शासनस्तरावरुन आवश्यक ती मदत करण्याच्या उद्देशाने कामाला सुरुवात झाली.
- स्वतंत्र प्राप्ती नंतर भारताने नियोजित अर्थ व्यवस्थेचा स्विकार केला .

- ***संदर्भ साहित्याचा आढावा :***
- ***नाशिक जिल्ह्यातील द्राक्ष उत्पादनाचा अभ्यास करताना वेगवेगळ्या माध्यमातून माहिती उपलब्ध केली. एम.एस.कुलकर्णी ,एम.मणी ,पी.जी.अडसूळे यांनी असे नमूद केले आहे की द्राक्षवेलीची (व्हिटीस व्हेनिफेरा एल ) जगात थंड हवामान असलेल्या विभागात एक महत्वाचे आर्थिक लाभ मिळवून देणारे पीक म्हणून लागवड केली जाते. एकूण लागवडीखाली 64,300 हेक्टर क्षेत्र असून वार्षिक उत्पादन 1.6दशलक्ष टन मिळते.***

- ***संशोधन समस्या :***
- ***नाशिक जिल्ह्यातील द्राक्षे उत्पादनाचा चिकित्सक अध्ययन हा संशोधनाचा मुख्य विषय आहे. आणि हा विषय खूप महत्वाचा वाटतो.***

- ***विषय निवडीचे कारण :***
- ***नाशिक जिल्हा द्राक्षे उत्पादनासाठी प्रसिध्द आहे. नाशिक जिल्हयाचे हवामान सर्वसाधारण विषम स्वरूपाचे असून, वार्षिक सरासरी पर्जन्यमान १,२९१- ०० मि..मि.आहे. जिल्हयातील जमिन काळी,माळ, कोरड व बरड चार प्रकारात विभागलेली आहे***

- ***विषयाचे महत्व :***
- ***येथील द्राक्षांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात मागणी आहे. येथील वातावरण द्राक्षांसाठी व मनुका उत्पादनासाथी अनुकुल आहे. मनुका उत्पादनात भारतात पहिल्या क्रमांकावर आहे. द्राक्षे खाण्यासाठी तसेच, जाम, जेली, ज्यूस, दारु व मनुका तयार करण्यासाठी वापरतात.द्राक्षे हि मधुर रसाची असतात.***

- संशोधन विषयाची व्याप्ती :
नाशिक मध्ये जवळपास सर्वच प्रकारची पिके घेतलीपिके जात असल्याने नाशिकला 'राज्याचे किचन' म्हंटले जाते. नाशिक हा उत्तर महाराष्ट्रातील महत्त्वाचा कृषी व औद्योगिक जिल्हा आहे. नाशिक जिल्हा द्राक्ष, यासाठी देशभरातच नव्हे, तर जगभरात प्रसिद्ध आहे
- द्राक्षे ही एक वेल वर्गातील वनस्पती आहे. याच्या दोन जाती आहेत. पिवळी द्राक्षे व काळी द्राक्षे ही फळे उन्हाळ्यात मिळतात. नाशिक जिल्ह्यात द्राक्षाचे प्रचंड उत्पादन होते. महाराष्ट्रात द्राक्षे लागवडी साठी प्रसिद्ध जिल्हा आहे. राज्याच्या 50% द्राक्षे उत्पादन नाशिक मध्ये होते.

- ***संशोधनाची उद्दिष्ट :***
- ***फळांच्या जागतिक उत्पादनामध्ये द्राक्षाचे उत्पादन इतर कोणत्याही फळापेक्षा जास्त आहे.***

- ***संशोधनाचे गृहिते :***
- ***आर्थिक लाभ मिळवून देणारे पीक म्हणून लागवड केली जाते.***

- ***नमुना निवड :***
- ***सदर संशोधनासाठी संशोधिका नाशिक जिल्ह्यातील द्राक्षे उत्पादनाचा चिकित्सक अध्ययन (विशेष संदर्भ – नाशिक जिल्हा )***

- ***समग्र संकलनाच्या पध्दती :***
- ***प्राथमिक सामग्री***
- ***दुय्यम सामग्री***

- ***समग्र विश्लेषणा च्या पध्दती :***
- ***नकाशा, तक्ता, आलेख व सारणी यांचा समावेश केला आहे.***

- प्रकरणाच्या रूपरेषा
- नमुना निवड
- समग्र संकलना च्या पध्दती
- प्रस्तावना समग्र विश्लेषणा च्या पध्दती
- संदर्भ साहित्याचा आढावा
- संशोधन समस्या
- विषय निवडीचे कारण
- विषयाचे महत्व
- संशोधन विषयाची व्याप्ती
- संशोधन उद्‌दिष्ट
- संशोधन गृहिते